Pimpri Chinchwad Police Commissionerate

## स्केटिंग प्रशिक्षकाचा निघृण खुन करणारा आरोपी २४ तासाच्या आत हिंजवडी पोलीसांकडुन जेरबंद

हिंजवडी पोलीस स्टेशनच्या हददीतुन दिनांक ०३/१२/२०१९ रोजी रात्रौ ०९/२२ ते दिनांक ०४/१२/२०१९ रोजी सकाळी ०९/०० वा.चे दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने इसम नामे निलेश शिवाजी नाईक वय २४ वर्षे रा. फ्लॅट नं. १०७, विघ्नहर्ता सोसायटी, पेट्रोलपंपासमोर, सुसगाव, ता.मुळशी जि.पुणे मुळ रा. शाहुनगर, सुदर्शन चौक, जयसिंगपुर, ता. शिरोळ, जि. कोल्हापुर यास लाईफ रिपब्लीक सोसायटी, कोलते पाटील डेव्हलपर्स यांचे बांधकाम साईटचे पाठिमागे असलेल्या मोकळ्या मैदानात नेवुन कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन कोणत्यातरी धारदार हत्याराने त्याचे मानेवर, गळ्यावर व डोक्यात वार करुन त्यास जबर जखमी करुन त्याचा खुन केल्याने त्याबाबत हिंजवडी पोलीस स्टेशनला गुन्हा नोद करण्यात आलेला होता,हिंजवडी पोलीस स्टेशनचे पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत होते.सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना मयत इसमाने फिर्यादी यांना आपण विठ्ठल मानमोडे याचेबरोबर असल्याचे सांगितल्याने संशयित विठठल मानमोडे याच्याबाबत माहिती घेतली असता तो राहते ठिकाणाहुन पसार झाल्याची माहीती समजली होती.

सदर गुन्हयांचा हिंजवडी पोलीस तपास करीत असताना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की विठठल ज्ञानोबा मानमोडे रा.विघ्नहर्ता बिल्डींग ,सुस गाव पेट्रोलपंपासमोर हा नवी मुंबई परिसरात हायवे रोडच्या लगत असलेल्या हॉटेलमध्ये बसलेला आहे त्यानुसार तात्रिक माहीतीच्या आधारे माहीती काढुन नवी मुंबई या ठिकाणी स्टॉफसह जावुन सदर आरोपी याचा शोध घेवुन

त्यास ताब्यात घेण्यात आलेले आहे,सदर आरोपी याच्याकडे मयत इसम निलेश शिवाजी नाईक यास मारण्याच्या कारणाबाबतचा तपास करता त्याने मयत इसम हा आरोपीच्या पत्नीस मेसेज करीत असल्याच्या कारणावरून चिडुन जावुन मयत यास दारू पाजुन त्याचा खुन केल्याचे तपासामध्ये सागितले आहे. आरोपी विठठल मानमोडे हा गुन्हेगारी पार्श्वभुमीचा असुन त्याच्यावर चतुश्रृंगी पोलीस स्टेशनला १ गुन्हा व वडगाव मावळ पोलीस स्टेशनला असा १ असे एकुण दोन गुन्हे दाखल आहे.सदर आरोपीस यास गुन्हा घडल्यापासुन २४ तासाच्या आत निष्पन्न करून त्यास हिंजवडी पोलीस स्टेशनकडुन अटक केलेले आहे.सदर गुन्हयांचा तपास सहा पोलीस निरीक्षक उध्दव खाडे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी सदरची कारवाई मा. संदीप बिष्णोई सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड मा. रामनाथ पोकळे सो. अप्पर पोलीस आयुक्त, मा. विनायक ढाकणे सो. पोलीस उप आयुक्त परि.२,पिं.चिं. शहर मा. श्रीकांत मोहिते सहा. पोलीस आयुक्त,पिं.चि., मा.यशवंत गवारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिजवडी पोलीस स्टेशन, मा.अजय जोगदंड पोलीस निरीक्षक(गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली हिजवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे अधिकारी अनुरुद्ध गिजे, सहा पो.फौज अंनत दळवी, सहा.पो.फौज वायबसे, पो.हवा.किरण पवार, पो.ना.विजय घाडगे ,आतिक शेख,हनुमंत कुंभार, कुणाल शिंदे, विवेक गायकवाड, पो.शि.सुभाष गुरव ,अमर राणे, झनकसिंग गुमलाडु, श्रीकांत चव्हाण, चंद्रकांत गडदे, विकी कदम, अली शेख, यांच्या पथकाने केलेली आहे.

(अजय जोगदंड)
पोलीस निरीक्षक (गुन्हे)
हिंजवडी पोलीस स्टेशन,पिं.चिं.शहर



पिंपरी-चिंचवड पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय